अहमदचं गुपित

फ्लॉरेन्स आणि जूडिथ, चित्रं : टेड, मराठी : रसिका





अहमदचं गुपित

फ्लॉरेन्स आणि जूडिथ, चित्रं : टेड

आज माझ्या मनात एक गुपित आहे. ते आज दिवसभर एका मित्रासारखं माझ्यासोबत राहील.

रात्री मी ते गुपित माझ्या कुटुंबियांना सांगेन. पण आत्ता मला शहरात काही कामं करायची आहेत.




माझं गाढव माझी गाडी ओढतं. आज मला बऱ्याच ठिकाणी जायचं आहे. रस्त्यांवर भरपूर गर्दी आहे. प्रत्येकजण कुठे ना कुठेतरी जात आहे. माझ्यासारखंच प्रत्येकाला काही ना काहीतरी महत्त्वाचं काम करायचं आहे.

म्हणूनच कदाचित इथे इतका गोंगाट आहे !









सर्व प्रकारचे आवाज , कदाचित जगातला प्रत्येक आवाज ह्या गोंगाटात मिसळलेला आहे – ट्रक आणि गाढवं, कार आणि उंट, गाड्या आणि बस, कुत्रे आणि घंट्या, आरोळ्या, हाका, शिट्ट्या आणि हशा, सगळंच एकत्र!

माझाही एक आवाज आहे ह्या सगळ्यात , तो म्हणजे माझ्या गाडीचा आवाज - करिंक-करिंक-रिंक, करिंक-करिंक-रिंक. माझ्या गाडीचा आवाज जर नसता, तर शहराचा आवाज आता आहे तसा नसता.


ह्या सर्व आवाजांमध्ये मला मात्र सर्वात मोठ्याने ऐकू येतोय तो म्हणजे माझ्या मनातल्या दडवून ठेवलेल्या गुपिताच आवाज, ज्याबद्दल मी अजून कोणालाच नाही सांगितलंय.

या सगळ्या आवाजांमध्ये कोणीतरी मला "अहमद! अहमद!" अशी हाक मारलेली ऐकू येतेय. आणि त्यासोबत माझं नावसुद्धा या शहराच्या आवाजाचा एक भाग होत आहे.

मला हसन बोलावतोय. तो त्याच्या गाडीच्या फळीवरून झुकला आहे. त्याच्या गाडीचे ठळक रंग रस्त्याच्या इतर रंगांमध्ये मिसळले आहेत, अगदी तसेच जसे शहरातले सगळे आवाज एकमेकांत मिसळून गेले आहेत.







माझ्या गाडीचे खास रंग हे सुद्धा शहराचाच भाग आहेत. गाढवाला जुंपलेल्या पट्ट्यांमध्ये माझ्या आवडीचे- निळा, हिरवा, सोनेरी असे रंग विणलेले आहेत. हसन माझ्या हातात शेंगा आणि नूडल्सची ताटली देत विचारतो, “काय म्हणतोय आजचा दिवस, मित्रा?”


मी खातो आणि हसनसोबत त्याच्या गमती-जमतींवर आणि गोष्टींवर हसतो. संध्याकाळी घरी गेल्यावर त्या गोष्टी माझ्या कुटुंबियांना ऐकवतो. पण आज संध्याकाळी मात्र मी त्यांना माझ्या गुपिताबद्दल सांगणार आहे. आजच्या संध्याकाळसाठी मी ते सांभाळून ठेवलंय. आता हसनच्या गाडीवर दुसरा ग्राहक येतो आहे, त्यामुळे मी त्याचा निरोप घेतो. आता दिवसभराची कामं घाईने पूर्ण करायला हवीत.




सगळ्यात आधी मी एका म्हाताऱ्या बाईच्या घरी जातो. ती बऱ्याच वेळापासून माझी वाट बघत असेल.

“अहमद! अहमद!” ती मला हाक मारते. “तू आज माझ्या चुलीसाठी इंधन आणतो आहेस का?”

ती आपल्या खिडकीतून वाकून बघते. मी तिच्याकडे पाहून हसतो. मी त्या जड आणि मोठ्या बाटल्या उंच जिना चढून, वरच्या मजल्यावर राहणाऱ्या म्हाताऱ्या बाईकडे पोहोचवू शकतो, याचा मला अभिमान आहे. मी हे कष्ट करून माझ्या कुटुंबाला हातभार लावतो, या गोष्टीचाही मला अभिमान वाटतो.








नंतर मी आणखी काही ठिकाणी जातो. आता थकल्यामुळे मला परत भूक लागली आहे. मी रोज दुपारचं जेवण जिथून विकत घेतो, ती गडद लाल आणि पिवळ्या रंगाची गाडी मी शोधू लागतो. ती गाडी मला नेहमीच्या ठिकाणी, जुन्या इमारतीजवळ उभी असलेली दिसते. मी भात आणि शेंगा विकत घेतो, आणि त्या जुन्या भिंतीच्या सावलीत बसून जेवतो.

माझ्या वडिलांनी मला सांगितलं होतं, की ती भिंत एक हजार वर्षं जुनी आहे. ती भिंत जेव्हा बांधली होती, तेव्हा आमच्या आजोबांच्या आजोबांचे आजोबासुद्धा अजून जन्मले नव्हते. मी आत्ता जिला टेकून बसलो आहे, अशा अनेक जुन्या इमारती आणि भिंती माझ्या शहरात आहेत.

जेवण झाल्यावर मी काही वेळ तिथेच शांतपणे डोळे मिटून बसतो. शांत बसण्यासाठी असा थोडा वेळ मी रोज काढावा अशी माझ्या वडिलांची इच्छा असते. माझे वडील अनेकदा म्हणतात, “जर आपलं डोकं शांत नसेल, तर डोक्यात नुसता कल्लोळ माजेल”. त्यांनी मला शहरात रस्ते कसे शोधायचे ते दाखवलं. आता मी ज्या ज्या ठिकाणी जड बाटल्या पोहोचवतो, ती सगळी ठिकाणं मला त्यांनीच दाखवली होती.





आधी हे काम एकट्याने करण्याइतकी ताकद माझ्यात नव्हती. तेव्हा मी फक्त गाडीत बसायचो आणि माझ्या वडिलांना जड बाटल्या उचलताना बघायचो. एक दिवस मी त्यांना म्हणालो, की आता मीसुद्धा हे काम करू शकतो. त्यांनी पाहिलं की मी गाडीतून एक जड बाटली उचलण्याचा प्रयत्न करत होतो. पण मी ती जड बाटली उचलूच शकलो नाही! ती उचलता आली नाही याची मला लाज वाटली.

“लवकर ताकदवान हो, अहमद” त्या दिवशी वडील मला म्हणाले. तेव्हा पहिल्यांदा त्यांच्या चेहऱ्यावर मला थकवा दिसला. शहरातल्या इतर वयस्कर लोकांच्या चेहऱ्यावर दिसत असे तसा.

“तू लवकर ताकदवान हो, अहमद,” वडील पुन्हा म्हणाले, “पण वयाने मोठा होण्याची घाई करू नकोस.”






आता मी त्या जुन्या इमारतीच्या सावलीत पडलो आहे. मला आमच्या शहराच्या बाजूने पसरलेल्या रेतीच्या समुद्राची आठवण येतेय. वारा जिथेपर्यंत जातो, तिथे दूरपर्यंत वाळू पसरलेली आहे.

वडील म्हणतात, की वारा आपल्यासोबत शहरभर रेती पसरवतो. आपण वाळवंटाजवळ राहतो, खरंतर आपण वाळवंटाचाच एक भाग आहोत याची तो आपल्याला आठवण करून देत असतो.

ते म्हणतात की आपलं शहर, एका बाजूला विस्तीर्ण, मोठं वाळवंट तर दुसऱ्या बाजूला एक मोठी नदी या दोन्हींच्या मध्ये वसलेलं आहे.



“आपण वाळवंट आणि नदी या आपल्या दोन मित्रांच्या मधोमध राहतो." वडील म्हणाले.


जगभरातील लोकांना आपल्या शहराबद्दल माहिती आहे. जगभर आपल्या शहराचं - "कैरो"चं नाव घेतलं जातं. आपल्या महान नदीचं -"नाईल"चं सुद्धा नाव घेतलं जातं.

“आपल्या वाळवंटाचं नाव काय?” मी विचारलं.

उत्तरादाखल वडिलांनी खांदे उडवले आणि ते हसले. “उष्ण वारे आपल्या वाळवंटाला घर मानतात.”


वडिलांनी स्वतः कधीच वाळवंट ओलांडलं नाही. पण शहरात असे उंटांचे काफिले आहेत ज्यांच्या मालकांनी वाळवंट बऱ्याच वेळा पार केलं आहे. अगदी तसंच जशा होड्या नदी पार करतात.

मी भिंतीला डोकं टेकून या सगळ्या गोष्टींचा आणि माझ्या गुपिताचा विचार करतो. पण घरी परत जायच्या आधी मला माझी कामं पूर्ण करायची आहेत.






सर्वात आधी मी माझ्या चपलेत भरलेली वाळू झटकतो. माझे वडील म्हणतात तसं वाळू हासुद्धा शहरातले आवाज आणि रंगांसारखाच आमच्या दैनंदिन जगण्याचा भाग आहे. पुढच्या थांबायच्या ठिकाणी जाताना वाटेत मला एक मुलगा ब्रेड घेऊन जाताना दिसतो. एका खिडकीतून एक मुलगी दोर बांधलेली टोपली खाली सोडते. मुलगा त्या टोपलीत ब्रेड ठेवतो. माझ्यासारखंच त्यालाही रोज बऱ्याच घरांमध्ये जावं लागतं. पण मी जे काम करतो, ते करण्याइतकी ताकद त्याच्यात नाही. माझ्या जड बाटल्यांसाठी कोणी खिडकीतून टोपली खाली सोडत नाही! मी जेवढं वजन खांद्यांवर उचलतो, तेवढं वजन दोर लावून उचलताच येणार नाही.










मग मला गुलाबाचं सरबत विकणाऱ्या माणसाचा आवाज, तो स्वतः दिसायच्या आधीच ऐकू येतो. तो रस्त्यावरून चालताना दोन कप एकमेकांवर वाजवतो, जेणे करून लोक त्याचा आवाज ऐकून सरबत प्यायला त्याच्याकडे येतील.

मी त्याला बघून हसतो. तो न हसता माझ्याकडे नुसताच बघतो. आम्ही दोघे एकमेकांकडे बघतो. आम्हाला माहीत आहे की आम्ही दोघेही एकाच दिवसाशी आणि एका शहराशी जोडलेले आहोत.

मी त्याच्याकडून गुलाबाचं सरबत विकत घेत नाही, पण त्याला बघून मला वातावरणातल्या प्रचंड उष्णतेची आणि मला तहान लागलेली असल्याची जाणीव होते. मी गाडीत ठेवलेल्या पाण्याच्या बाटलीतलं पाणी पितो. मी नेहमी गाडीत माझ्यासोबत पाण्याची बाटली ठेवतो.

मला अजून बऱ्याच ठिकाणी थांबायचं आहे आणि मग तिथले अरुंद जिने जड बाटल्या घेऊन चढायचे आहेत. त्यानंतर मी परत माझ्या गाडीत येऊन बसेन. गाडी करिंक-करिंक-रिंक, करिंक-करिंक-रिंक आवाज करत पुढे जाईल.

आजचा दिवस खूप लांबला. कदाचित आज मला माझं गुपित सांगायची संधी मिळणारच नाही. पण मला माहीत हे आहे की हा दिवस सरेल, आणि मग मला गुपित सांगण्यासाठी दुसरी एखादी संधी नक्की मिळेल.







शेवटी मी घरी पोहोचतो. सूर्य मावळला आहे आणि सगळीकडे गडद अंधार झाला आहे. या अंधारात पांढऱ्या आणि काळ्या धाग्यांमध्येही फरक करणं अवघड होईल. आईने आधीच घरात कंदील लावले आहेत. सगळेजण माझ्या परतण्याची वाट बघत आहेत.


दिवसभरातल्या गमती-जमती सांगायच्या ऐवजी मी त्यांना म्हणालो, “हे बघा, मला तुम्हां सगळ्यांना काहीतरी दाखवायचंय.”

आता गुपित सांगायची वेळ आली आहे. त्याआधी मी एक मोठा श्वास घेतो.





“हे बघा,” मी म्हणालो. “बघा, मी माझं नाव लिहू शकतो!”



मी माझं नाव पुन्हा पुन्हा लिहितो आहे आणि सगळेजण मला लिहिताना बघत आहेत. मला असं वाटतं की माझ्या नावाचा उच्चार केल्यावर ते लगेच विरून जातं, त्यापेक्षा आता ते जास्त काळ टिकून राहील. कदाचित ते शहरातल्या जुन्या इमारतींसारखंच, हजारो वर्षांपर्यंत जिवंत राहील.



